**प्रेस नोट** **दि.२५/०८/२०१९**

## कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे शहर

## दहीहंडी साजरा करणारे मंडळे व गोविंदाचा पुष्पगुच्छ व शुभेच्छा पत्र देवून केला सत्कार

दि.२४/०८/२०१९ रोजी गोकुळाष्टमी व गोपाळकाला निमित्त सार्वजनिक मंडळातील युवा वर्ग दहिहंडी साजरी करीत असतात. सदर दहिहंडी उत्सव साजरा करीत असताना बाळ गोपाळ व गोविंदानी स्वतः ची व इतरांची सुरक्षेची काळजी घेवून सदरचा दहिहंडी उत्सव शांततेत साजरा व्हावा, या उद्देशाने मा.पोलीस आयुक्त सो., पुणे शहर यांचे संकल्पनेतून दहीहंडी साजरा करणारे मंडळांना व दहिहंडी फोडणारे गोविंदांना त्यांना दहिहंडी उत्सवामध्ये सुरक्षिततेची काळजी घ्यावी या करीता सार्वजनिक मंडळे व दहिहंडी फोडणारे गोविंदांना पुष्पगुच्छ व शुभेच्छा पत्र देण्यात यावे, या संकल्पनेतून दहिहंडी उत्सव हा शांततेत पार पाडावा.

मा.पोलीस आयुक्त सो., पुणे शहर यांचे संकल्पनेतून व माननीयांनी दिलेल्या मार्गदर्शनाखाली श्री. मदन बहाद्दरपुरे सो., वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे शहर यांनी दि.२४/०८/२०१९ रोजी होणारे गोकुळाष्टमी व गोपाळकाला निमित्त कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्रातील सार्वजनिक मंडळातील पदाधिकारी यांना पोलीस स्टेशन येथे बोलावून त्यांना पुष्पगुच्छ देवून **''बाळ गोपाळांनो घरी लवकर व सुरक्षित या... तुमची यशोदा मैय्या तुमची वाट पाहतेय'' अशा मजकूराचे शुभेच्छा पत्र देण्यात आले. त्याचप्रमाणे** दहिहंडी उत्सवामध्ये दहीहंडी फोडणारे गोविंदांनाही वरील आशयाचे पत्र देण्यात आले व उत्सव आनंदात, वेळेत व सुरक्षिततेची काळजी घेवून, कोणासही त्रास होणार नाही, याबाबतची दक्षता घेणेबाबत समुपदेशन करण्यात आले होते. त्याप्रमाणे सार्वजनिक मंडळे व गोविंदांनी वेळेत, आनंतदात व शांततेत दहिहंडी उत्सव साजरा केलेला आहे.

(मदन बहाद्दरपुरे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे शहर